आयुर्वेद महाविद्यालयाला मान्यता देण्याबाबत
आनंद चॅरिटेबल ट्रस्ट, वैजापूर, जि. औरंगाबाद संचलित आनंद आयुर्वेद कॉलेज, फुलेवाडी रोड, वैजापूर, जि. औरंगाबाद

महाराष्ट्र शासन

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,
शासन निर्णय क्रमांक एएमसी-२०१७/प्र.क्र.४४/१७/शिक्षण-१,
९ वा मजला, गो.ते.रुग्णालय संकुल, लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई ४०० ००१
दिनांक:- २५ सप्टेंबर, २०१८

वाचा :-
१. शासनाचे समक्रमांकित ना-हरकत प्रमाणपत्र दिनांक २५.०४.२०१७
२. कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांचे पत्र क्र.मआविवि/पीवी/युजी/कन्सेंट/आयुर्वेद/६०२/२०१७,दि. २९.०५.२०१७
३. आयुष मंत्रालय, नवी दिल्ली यांचे पत्र क्र. F.No.R.१२०११/०९/२०१७-EP(IM-I), दिनांक १४.०९.२०१८.

प्रस्तावना:-

आनंद चॅरिटेबल ट्रस्ट, वैजापूर, जि. औरंगाबाद संचलित आनंद आयुर्वेद कॉलेज, फुलेवाडी रोड, वैजापूर, जि. औरंगाबाद या आयुर्वेद महाविद्यालयास संदर्भाधीन पत्र क्रमांक-१ अन्वये ६० विद्यार्थी क्षमतेसाठी ना-हरकत प्रमाणपत्र दिलेले आहे. तसेच शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करिता केंद्र शासनाने संदर्भाधीन पत्र क्रमांक (३) अन्वये ६० विद्यार्थी प्रवेश क्षमतेसाठी संस्थेच्या सदर महाविद्यालयास मान्यता दिलेली आहे. सदर बाब विचारात घेता संस्थेच्या आयुर्वेद महाविद्यालयाला शैक्षणिक वर्ष २०१८-१९ साठी आयुर्वेद महाविद्यालय सुरु करण्याकरीता शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

आनंद चॅरिटेबल ट्रस्ट, वैजापूर, जि. औरंगाबाद संचलित आनंद आयुर्वेद कॉलेज, फुलेवाडी रोड, वैजापूर, जि. औरंगाबाद या आयुर्वेद महाविद्यालयास शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करिता केंद्र शासनाने संदर्भाधीन पत्र क्रमांक (३) अन्वये ६० विद्यार्थी प्रवेश क्षमतेसाठी मान्यता दिलेली आहे. त्यानुषंगाने सदर आयुर्वेद महाविद्यालयास शैक्षणिक वर्ष २०१८-१९ साठी ६० विद्यार्थी प्रवेशित करण्यासाठी पुढील अटी व शर्तीच्या अधीन राहून परवानगी देण्यात येत आहे.

अटी व शर्ती:-

१. आनंद चॅरिटेबल ट्रस्ट, वैजापूर, जि. औरंगाबाद संचलित आनंद आयुर्वेद कॉलेज, फुलेवाडी रोड, वैजापूर, जि. औरंगाबाद या आयुर्वेद महाविद्यालयातील विद्यार्थी प्रवेश क्षमता केंद्र शासनाने निर्धारित केल्यानुसार ६० एवढी राहील.

२. राज्य शासन/ केंद्र शासन/ मा. सर्वोच्च न्यायालय अथवा मा. उच्च न्यायालय यांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार सदर अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरीता निश्चित करण्यात आलेली कार्यपध्दत अवलंबिण्यात यावी.

३. शासकीय नियम/ अधिनियम/शासन निर्णय तसेच मा. सर्वोच्च व मा. उच्च न्यायालय यांनी वेळोवेळी दिलेल्या निर्णयानुसार शैक्षणिक शुल्कासाठी जी कार्यपध्दती अनुसरणे वेळोवेळी भाग असेल, त्याप्रमाणे शैक्षणिक शुल्क निश्चित करण्यात यावे.

४. केंद्र शासन, केंद्रिय भारतीय चिकित्सा परिषद, नवी दिल्ली व राज्य शासन यांनी आयुर्वेद अभ्यासक्रमाबाबत वेळोवेळी विहीत केलेल्या नियमांचे व मानकांचे पालन करणे संस्थेवर बंधनकारक राहील.

५. महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिटयुशन्स (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७ (महाराष्ट्र ॲक्ट क्र.VI १९८८) मधील तरतुदींचे संस्थेने काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

६. सदरहू संस्थेस कायम विना अनुदान तत्वावर मान्यता देण्यात आली आहे. त्यामुळे संस्था आवर्ती/अनावर्ती स्वरुपाच्या खर्चासाठी अनुदानाची मागणी शासनाकडे करणार नाही.

७. शासकीय आयुर्वेद किंवा तत्सम महाविद्यालयातील कोणत्याही अध्यापकास तो सेवानिवृत्त होईपर्यंत किंवा नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होईपर्यंत संस्थेमध्ये नोकरी देता येणार नाही किंवा त्याच्या सेवा संस्थेस वापरता येणार नाहीत.

८. संस्थेने कोणत्याही परिस्थितीत शासनाने मान्य केलेल्या विद्यार्थी प्रवेश क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थी प्रवेश करु नयेत.

९. केंद्र शासनाने दिलेली परवानगी ही सन २०१८-१९ वर्षाकरिता प्रवेशित होणारे विद्यार्थी अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्षामध्ये दाखल होईपर्यंत असून संस्थेने त्यानुसार पुढील वर्षाचे विद्यार्थी प्रवेश करण्यापूर्वी केंद्र शासनाच्या तसेच त्या आधारे राज्य शासनाच्या परवानगीचे नुतनीकरण करुन घेणे बंधनकारक राहील.

१०. संस्थेने गुणवत्तेवर आधारित प्रवेश केलेल्या विद्यार्थ्यांच्या याद्या प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई अथवा तत्सम प्राधिकरण यांचेकडून मंजूर घेणे व या अभ्यासक्रमासाठी आकारण्यात येणा-या फी शुल्काची निश्चिती शुल्क नियामक प्राधिकरण अथवा तत्सम प्राधिकरण यांचेकडून करुन घेणे संस्थेवर बंधनकारक राहील.

सदर आदेश केंद्र शासनाने संदर्भ क्र.(३) अन्वये केंद्र शासनाने दिलेली मान्यता विचारात घेऊन, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम, १९९८ मधील कलम ६४ (५) नुसार शासनास प्रदत्त असलेल्या अधिकाराचा वापर करुन निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(डॉ.श्री.पु.कोतवाल)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राज भवन, मलबार हिल, मुंबई
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. मंत्री (वैद्यकीय शिक्षण) यांचे खासगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

D:\शा नि 2017\AYURVED\CR-44-2017-...docx

४. मा.राज्यमंत्री (वैद्यकीय शिक्षण) यांचे खासगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.
६. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
७. संचालक, आयुष संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
८. कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक.
९. अध्यक्ष/प्राचार्य, आनंद चॅरिटेबल ट्रस्ट, वैजापूर, जि. औरंगाबाद संचलित आनंद आयुर्वेद कॉलेज, फुलेवाडी रोड, वैजापूर, जि. औरंगाबाद.
१०. ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ, ग्रंथालय, विधानभवन, मुंबई.
११. अधिष्ठाता, सर्व शासकीय आयुर्वेद महाविद्यालये.
१२. अध्यक्ष, असोसिएशन ऑफ मॅनेजमेंटस ऑफ अनएडेड प्रायव्हेट, कॉलेजेस, महाराष्ट्र, मॅझनिन फ्लोअर, श्री. जी. हाऊस, ७५, मिंटरोड, फोर्ट, मुंबई.
१३. कार्यालयीन सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण/ शुल्क नियामक प्राधिकरण, २०५, गर्व्हमेंट पॉलीटेक्नीक बिल्डींग, ४९, खेरवाडी, अली यावर जंग मार्ग, बांद्रा (पू) मुंबई-५१.
१४. निवडनस्ती (शिक्षण-१).